महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९८ वा | दिनांक : २६/०९/२०२५ | वार : शुक्रवार




## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींकडून मोठा भ्रष्टाचार : अंजली दमानिया

**मुंबई** : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी भाजप नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. नितीन गडकरी यांनी टोलच्या माध्यमातून मोठा भ्रष्टाचार केला असून त्यांच्याच कंपन्यांना लाभ झाला असल्याचा गंभीर आरोप दमानिया यांनी केला आहे. अंजली दमानिया यांनी केलेल्या या आरोपांवर भाजपकडून पहिली प्रतिक्रिया आली असून हे सर्व आरोप तथ्यहीन असल्याचे म्हटले आहे.

भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी अंजली दमानिया यांनी नितीन गडकरी यांच्यावर केलेल्या गंभीर आरोपांवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, नितीन गडकरी यांच्यावरील आरोप तथ्य नसलेले, खोटे आणि जुने आरोप आहेत. हे आरोप 2013 साली झाले होते, तेव्हा कॉंग्रेसच्या यंत्रणांनी चौकशी केली होती. मात्र, त्या चौकशीत काहीही तथ्य आढळले नाही. केवळ बदनामी करण्यासाठी असे आरोप केले जात असल्याचे उपाध्ये यांनी म्हटले आहे. तसेच याला खरेतर कोर्टात चॅलेंज केले जाऊ शकते. मात्र, काही लोक तसे करत नाहीत. फक्त बदनामीसाठी बेछूट आरोप करतात, असे केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे.

नितीन गडकरींनीच जनतेवर टोल थोपवल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे. त्या म्हणाल्या, नागरिक आधीच रोड टॅक्स, सेल्स टॅक्स, जीएसटी असे सर्व कर भरत असताना टोल का लादला जात आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच टोलमधून मिळालेला पैसा 'आयडीएल' नावाच्या कंपनीत गेला आणि तिथून तो नितीन गडकरी यांच्या दोन्ही मुलांच्या कंपन्यांमध्ये हस्तांतरित करण्यात आला, असा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे.

पुढे बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या, ज्यांना एक्सप्रेस वे मॅन ऑफ इंडिया म्हटले जाते, ते प्रत्येक किलोमीटर रस्त्याच्या कामामागे आणि टोलमध्ये पैसे खात आहेत. दमानिया यांनी सरकारच्या बिल्ड ऑपरेटर ट्रान्सफर आणि टोल ऑपरेटर ट्रान्सफर या मॉडेल्सवर टीका केली आहे.

या सर्व प्रकरणात अंजली दमानिया यांनी 128 कंपन्यांचा उल्लेख केला आहे. माझ्याकडे या सर्व कंपन्यांची माहिती आहे आणि जर ही संपूर्ण माहिती उघड केली तर वर्षभर पुरेल इतका भ्रष्टाचार यातून बाहेर येईल, असे दमानिया म्हणाल्या. त्यांनी पुढे सांगितले की, प्रत्येक कंत्राटामध्ये गडकरींशी संबंधित कंपन्या थेट किंवा अप्रत्यक्षरित्या सहभागी होतात, ही बाब गंभीर आहे. दमानिया यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांमुळे टोल व इथेनॉल उद्योगातील पारदर्शकतेबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जनतेच्या पैशावर उभारलेले प्रकल्प जर खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठी वळवले जात असतील, तर हा स्पष्ट घोटाळा आहे, असे मतही त्यांनी मांडले.

# महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५


# कटू सत्य

जीवनाची सकाळ संपली
डोंब भुकेचा उठला

ऐन दुपारच्या समयाला
डोईवर सूर्य तापला

दुपारची सावली कलणार
पोटात भाकरी मिळणार

या उत्कंठ आशेने
सोसले ऊन दुपारचे


सावली कलली सूर्याची
संध्याकाळच्या समया

लातरी ही जीवनात थारा
नाही मिळाला सावलीला

भुकेचा डोंब जीवनात
कटू सत्य बनवून राहिला

**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

# बस स्थानका पासून स्वच्छता महोत्सवास सुरुवात



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** दिनांक 25 सप्टेंबर 2025 रोजी उमरगा येथील भारत शिक्षण संस्था संचलित, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाच्या वतीने बसस्थानक येथे स्वच्छता करण्यात आली. भारत सरकार द्वारा आयोजित स्वच्छोत्सव -स्वच्छ व हरित उत्सव , स्वच्छता ही सेवा ही थीम घेऊन एक तास , एक दिवस स्वच्छता करणे ह्या उदेश्याने आवास आणि शहरी मंत्रालयाच्या वतीने दिनांक 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती पर्यंत हे अभियान संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. मध्य सर्व सार्वजनिक,सामाजिक ठिकाणी स्वच्छता करुण स्वच्छतेचा संदेश समाजा पर्यंत पोहचवणे आहे.

त्याच अनुषंगाने डीजी एनसीसी कार्यालय दिल्ली द्वारा सर्व राज्यात ज्या ठिकाणी शाळा, महाविद्यालय येथे एनसीसी विभाग आहे त्यांना या कार्यक्रमासाठी सामुदायिक योगदानला चालना मिळण्यासाठी हे स्वच्छता मोहीम , रॅली ,श्रमदान, रक्तदान घेण्यात येणार आहेत. यात सर्वांनी निस्वार्थपणे युवकांनी,समाजातील सर्व व्यक्तिनी राष्ट्रनिर्माण करिता योगदान देणे ह्या उद्देश्याने हे अभियान राबविण्यात येत आहे .

स्वच्छता महोत्सव अभियाना अंतर्गत आज उमरगा बस स्थानक येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली यावेळी डेपो मॅनेजर पी व्ही कुलकर्णी,वाहतूक निरीक्षक अ ना सरवदे, अदिनाथ बिराजदार , लिपिक व्ही व्ही चव्हाण उपस्थित राहुण स्वच्छता केली.

या स्वच्छता अभियानासाठी प्राचार्य डॉ संजय अस्वले ,डॉ विलास इंगळे डॉ पद्माकर पिटले, प्रा गुंडाबापू मोरे , प्रा शैलेश महामुनी श्री नितीन कोराळे , श्री राजकुमार सोनवणे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.


Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903


# जेईएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा



**जालना :** जेईएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. गणेश रोकडे, प्रा करण सातुरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश, सरकटे डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. योगेश लहामटे, प्रा. किशोर तापडिया, आदि उपस्थित होते.

# स्वामी प्रणवानंद सरस्वती हायस्कूल कालीमठ उपळा येथे शालेय मुलींच्या कब्बडी स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात साजरे



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** तालुका क्रिडा समिती व स्वामी प्रणवानंद सरस्वती हायस्कूल कालीमठ उपळा यांच्या सयुक्त विद्यमानाने आयोजित शालेय कब्बडी स्पर्धेचे उद्घाटन कालीमठ ट्रस्ट चे सचिव सौ सुचिताताई शिवाजी सोनवणे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तालुका क्रिडा संकुल समिती सदस्य व क्रीडा मार्गदर्शक प्रवीण शिंदे तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे तसेच स्वामी प्रणवानंद सरस्वती हायस्कूल कालीमठ उपळा या शाळेचे मुख्याध्यापक हेमकांत पाटील व राज्य कुस्ती पंच विजयसिंह बरवाल कबडीचे पंच कडूबा चव्हान तसेच परिसरातील जेष्ट नागरिक उपस्थित होते ,मुलींच्या या स्पर्धेमध्ये एकूण ४७ शालेय संघांनी सहभाग नोंदवला.

यावेळी पंच कडूबा चव्हाण . प्रशांत नवले अरुण पवार रवी कुमार सोनकांबळे संदीप बागुल किशोर गवळी शाळेचे शिक्षक ,घरटे एस व्ही ,देवरे पी आर ,नवसरे एस एस ,बुरकुल पी के ,जाधव के एस ,वेळोस एस ओ ,पाटील के व्ही ,देवरे व्ही के ,देवरे भैय्यासाहेब यांनी अथक परिश्रम घेऊन स्पर्धा उत्सहात पार पडली .


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्ताने प्रबोधन





**जालना:** २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त, मानवी जीवनात आहार, आरोग्य आणि रक्तदानाचे महत्त्व यावर डॉ. पल्लवी जाधव (जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना) यांचे उद्बोधक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सुदृढ आरोग्यासाठी आपला आहार विहार उत्तम असणे आवश्यक आहे. व्यक्तीने आपल्या शारीरिक गरजांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे आरोग्य निकोप राहणार नाही. त्यासाठी उत्तम आहार विहार गरजेचा आहे.

रक्तदान हे जीवनदान आहे त्यामुळे अगोदर आपण सुदृढ बना आणि नंतर इतरांना सुदृढ बनवा असे यावेळी त्या म्हणाल्या.प्रा.डॉ. सुरेश कांगणे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, युवकांनी आपल्यातील आळस झटकून आपले आरोग्य उत्तम राखावे.

अडचणीत सापडलेल्यांना त्यांनी मदत करावी. ही संवेदनशीलता त्यांनी समाजाप्रती दाखवावी यातच खऱ्या अर्थाने आपलं तारुण्य लपलेलं आहे.कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. उद्धव थोरवे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. भगवानसिंग डोभाळ यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. क्षमा अनभुले यांची उपस्थिती होती.प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.आपण समाजाचे देणे लागतो म्हणून जबाबदारी पूर्ण करावी असे त्या म्हणाल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास खरात यांनी केले तर आभार प्रा. अभिजीत भुतेकर यांनी मानले.

यावेळी प्रा. डॉ. व्यंकट कोरेबोईनवाड, प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. प्रवीण कोकणे, प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. डॉ. कालिदास सूर्यवंशी यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.






## राजीव गांधी महाविद्यालय करमाड रा.से.यो. विभाग अंतर्गत भव्य नेत्र तपासणी शिबीर



**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे स्वच्छता ही सेवा अभियान 2025 या उपक्रमाअंतर्गत व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, ग्रामपंचायत कार्यालय करमाड आणि लायन्स हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत नेत्र तपासणी शिबीर व "एक दिन – एक घंटा – एक साथ" श्रमदान स्वच्छता अभियान यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिरात मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू व इतर डोळ्याच्या आजारांचे मोफत ऑपरेशन, अतिशय अल्पदरात चष्मा वाटप तसेच डोळ्यांसाठी वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन देण्यात आले. तपासणी झालेल्या प्रत्येक व्यक्तीस वैद्यकीय तपासणी अहवाल देखील देण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायत करमाडच्या सरपंच श्रीमती प्रमिला मुळे यांच्या हस्ते झाले.उपसरपंच श्री. सुनिल तारो तसेच विशेष उपस्थिती म्हणून श्रीमती डॉ. शैलजा जोशी (सचिव, भा.सं.स.शि.प्र. मंडळ)प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) हे होते.

प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे अध्यक्षस्थानी होते.यावेळीप्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, या नेत्र तपासणी शिबिरातून आरोग्य जागरूकता वाढून समाजातील अनेकांना उज्ज्वल दृष्टी मिळणार आहे तसेच "स्वच्छता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

विद्यार्थ्यांनी एक तास समाजासाठी श्रमदान करणे म्हणजे देशासाठी एक मौल्यवान देणगी आहे.या शिबिरात महिला पुरुष मिळून 179 जणांनी आपल्या डोळ्याची तपासणी केली.--- अतिशय अल्पदरात वाटप.या प्रसंगी *राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. कालिदास फड व डॉ. नितीन मुळे यांच्यासह डॉ. किशोर काळे, डॉ. नरेश डहाळे,डॉ. बाळासाहेब लिहिणार डॉ. चव्हाण, डॉ. राऊत, डॉ. धोंडगे, डॉ. मोरे, डॉ. पठाण, खरात सर, घोडके सर, लावंड सर, माठे सर, होळकर सर तसेच कुलकर्णी मॅडम, पाटील मॅडम, आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्र संचलन डॉ. किशोर काळे यांनी तर आभार NNS सह कार्यक्रम अधिकारी डॉ. नितीन मुळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे राबविण्यात आलेला हा उपक्रम गावकरी आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, स्वच्छतेची जाणीव व आरोग्यविषयक सजगता निर्माण करणारा ठरला.

## देवगिरी किल्ल्यात राजा रामदेवराय यांची कुल देवता ग्रामदेवी रासाई माता नवरात्र महोत्सवास सुरवात



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** देवगिरी दौलताबाद येथील ग्राम देवी रासाई माता मदिरात घट स्थापने पासुन नवरात्र महोत्सव सुरु झाले आहे,या पर्वकाळात ग्रामस्त रोज विधिवत पुजा आर्च्या ,घटस्थापणा केली जाते देवगिरी चे रासाई मातेचे मदिर हे ऐतिहासिक पुरातन आसुन साधारण बाराव्या शतकातील आसावे देवगिरी किल्याच्या पाठीमागील बाजुच्या पायथ्याशी खदकाच्या वरील बाजुस एका गुहे मधे रसाई देवीची बैठी मुर्ती आहे.

या ठिकानी जाण्या साठी दौलताबाद बस स्टैंड कमानीतून गवळीवाडा येथून जाता येते पुढे एक दगडी कमान (दरवाजा) आहे पुढे गेले नंतर उजव्या हाताला थोडे वर चढुण गेल्या वर पुढे पायऱ्या उतरल्या नंतर दोन्ही बाजूंनी पाण्याने भरलेले खंदक आहे आणि मधोमध् एक दगडी पुल आहे समोरच छोडासा दरवाजा आहे ,आत डोकाउन पाहीले तर रासाई मातेची छानशी मुर्ती नजरेस पडते.

रासाई माता ही 'देवगिरीचे राजा रामदेव राय' यांची कुलदैवत असल्याचे येथील जुने लोक सांगतात दरवर्षी येथे नवरात्र महोत्सवाचे आयोजन केले जाते चैत्र पोर्णिमे ला येथे यात्रा असते यात्रा निमित नवसाच्या बारा गाड्या हि ओढल्या जातात येथे महाराष्टा तुन श्रीरामपुर ,बाभळेश्वर, अमरावती, बीड ,पुणे ,मुम्बई ,लातूर, वैजापुर ,बेलापुर( नगर) येथील भाविक येतात नवरात्र व् दर पोर्णिमेला देवीला नवेद्य म्हनुन् पूरणपोळी नवेद्य दिले जातो.

या देवीला मास वगैरे चालत नाही या मंदिराचे पुजारी महेश आगळे व परिवार गुरव हे आहे त्यांची ही पाचवी पीढ़ी आहे अशी माहिती त्यांनी दिलीमंदिर हे पुरातत्व विभागत आहे मंदिर हे बारवे शतकाचे असल्यामुळे येथील बहुतांश भाग जीर्ण अवस्तेथ झाला आहे.

चढ़ऱ्या च्या पायऱ्या तूटलेल्या आहे पिण्यासाठी पाणी नाही स्थानिक लोक शँकर जाधव,रावसाहेब कांजुने,प्रकाश बळी,विलास जाधव, डाँ कैलास निकम ,गणेश जाधव ,आदी ग्रामस्तानी रस्ता दुरुस्ती व मंदिराच्या पायऱ्या दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५


# स्वच्छता हीच सेवा



**छत्रपती संभाजीनगर :** आज दिनांक 25 9 2025 या दिवशी महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेमध्ये तसेच परिसरामध्ये स्वच्छता ही सेवा हे अभियान राबविण्यात आले.

माननीय आयुक्त आदरणीय श्रीकांत साहेब, माननीय उपायुक्त श्री अंकुश जी पांढरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज चिकलठाणा परिसरातील शालेय परिसर तसेच गावातील परिसर शाळेच्या पाठीमागील परिसर हा स्वच्छ करण्यात आला.

आपल्या महानगरपालिकेतील स्वच्छता निरीक्षक व सफाई कर्मचारी तसेच शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी या स्वच्छता ही सेवा या उपक्रमामध्ये सहभागी झाले.

सर्वांनी मिळून शालेय परिसर व शाळेच्या बाहेरील परिसर स्वच्छ करून घेतला. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी या सर्वांनी या अभियाना त रेरेने भाग घेऊन स्वच्छता हीच सेवा हे अभियान यशस्वीरित्या पूर्ण केले.

शाळेतील विद्यार्थ्यांनीही यामध्ये सहभाग नोंदविला मुलांनी घोषणा दिल्या 'माझे शहर स्वच्छ शहर ' 'माझी शाळा सुंदर शाळा'. सर्वांनी मिळून आजूबाजूचा परिसर स्वच्छ करून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांना जामीन

**पुणे :** पुण्यातील कथित रेव्ह पार्टी प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना जामीन मंजूर झाला आहे. मागील दोन महिन्यांपासून प्रांजल खेवलकर हे तुरुंगात होते. आज अखेर त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. तसेच यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ खडसे म्हणाले की ते लवकरच निर्दोष मुक्त होतील, असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला आहे. तसेच प्रांजल खेवलकर यांच्यासह इतर आरोपींना देखील जामीन मंजूर झाल्याची माहिती समोर आली आहे.

पुण्यातील खराडी भागात अंमली पदार्थांच्या पार्टीवर पोलिसांनी 27 जुलै रोजी छापा टाकला होता. या छाप्यात पोलिसांनी अंमली पदार्थ जप्त केले. याप्रकरणी पोलिसांनी काही महिलांसह प्रांजल खेवलकर यांना अटक केली होती. या प्रकरणातील मुख्य मुद्दा प्रांजल खेवलकर यांनी अंमली पदार्थांचे सेवन केले होते, हा होता.

दीड महिन्यांहून अधिक काळ तुरुंगात राहिल्यानंतर, याच मुद्द्यावर पुणे सत्र न्यायालयाने प्रांजल खेवलकर यांना जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात अटक झालेल्या इतर आरोपींनाही जामीन मिळाला आहे. प्रांजल खेवलकर यांची उद्या येरवडा कारागृहातून सुटका होण्याची शक्यता आहे.

एकनाथ खडसे यांचे जावई आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांच्या अटकेमुळे या प्रकरणाची राज्यभरात मोठी चर्चा झाली होती. या प्रकरणात बीडमधील एका स्वयंसेवी संस्थेने राज्य महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनीही प्रांजल खेवलकर यांच्यावर काही आरोप केले होते.

दरम्यान, पुणे सत्र न्यायालयाने प्रांजल खेवलकर यांच्यासह या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर आरोपींनाही जामीन मंजूर केला आहे. यामुळे प्रांजल खेवलकर यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, त्यांची उद्या येरवडा कारागृहातून सुटका होण्याची शक्यता आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५


## श्रीकृष्ण महाविद्यालयात पं. दीनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांची ५२वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली."स्वच्छता हीच सेवा २०२५ " अभियानांतर्गत भारत सरकार ,युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना कक्ष ,महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ सप्टेंबर २०२५ पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त "एक ... दिन.,एक घंटा,एक साथ राष्ट्र स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. सुरुवातीला पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पंडित दीनदयाल उपाध्याय हे सर्वंकष मानवतावादाचे उपासक असून अंत्योदय संकल्पनेचे पुरस्कर्ते होते. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी सृष्टीजीवनबरोबर समाजविचारही महत्वाचा मानला. त्यांच्या वैचारिक दर्शनानुसार जनतेच्या अंतिम व्यक्तीपर्यंत पोहोचणारी सेवा ही खरी सेवा आहे.असे सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.आर.एन.रेडे यांनी सांगितले.यावेळी मंचावर डॉ. किसन लोहार,डॉ.भाऊसाहेब उगले,डॉ. मल्लमा अंबुसे,प्रा.हनुमंत देशमुख उपस्थित होते.या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरून समाजोपयोगी कार्यानुसार स्वच्छता मोहीम राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे त्याचाच भाग म्हणून श्रीकृष्ण महाविद्यालयात सकाळी नऊ ते दहा परिसर स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले त्यात महाविद्यालयातील प्रा. डॉ. किसन लोहार, डॉ. दस्तगीर पठाण, डॉ. बालाजी कोनाळे, प्रा. डॉ. योगीराज विजापुरे, प्रा. डॉ. रामकृष्ण कदम, डॉ. महादेव खोत, डॉ. आसिया चिश्ती, डॉ. मेघा जोशी, डॉ. उमाकांत सूर्यवंशी , डॉ. रमेश पात्रे,डॉ.प्रा.रामदास कोळी,डॉ.सुनील पतंगे, डॉ.रमेश मांदळे ,डॉ. अनिलबापू काळदाते, प्रा.एन.जे.पवार,डॉ.दिगंबर चव्हाण,डॉ. पी.एस .राऊत,डॉ. विलास होगाडे,डॉ.विनोद धनेराव, प्रा.अरविंद राठोड,प्रा.शंकर चव्हाण, प्रा.आय.एस. इनामदार, प्रा.कोडे, प्रा.गायकवाड, कार्यालय अधीक्षक सिद्धप्पा देशमुख इत्यादी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला."मी आज स्वच्छतेसाठी प्रतिज्ञा करतो.मी स्वतः स्वच्छ राहीन आणि माझ्या परिसरालाही स्वच्छ ठेवीन .मी स्वच्छतेची ही सवय माझ्या कुटुंबीय ,मित्र,नातेवाईक,व शेजारी यांच्यात रुजवून मी एक स्वच्छ ,निरोगी,व सुंदर भारत घडविण्यासाठी माझे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडून स्वच्छ भारत साकार करण्यासाठी मी पूर्ण योगदान देईन " अशी अध्यक्षीय समारोपापूर्वी डॉ. राजेंद्र निगडे यांनी उपस्थित सर्वांना या स्वच्छतेची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भाऊसाहेब उगले यांनी केले. तर आभारप्रदर्शन डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी मानले त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## रोटरी क्लब ऑफ मुरुम सिटी आयोजित आदर्श गणेश मंडळ पुरस्कार वितरण सोहळा




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शहरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रोटरी क्लब ऑफ मुरुम सिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आदर्श गणेश मंडळ पुरस्कार २०२५ वितरण सोहळा शहरातील महात्मा बसवेश्वर पतसंस्थेच्या सभागृहात बुधवारी (ता. २४) रोजी उत्साही वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सुर्यवंशी होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप दहिफळे, महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष शिवशरण वरनाळे, पतसंस्थेचे सचिव शरणाप्पा मुदकन्ना, रोटरीचे सचिव कल्लप्पा पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिवशरण वरनाळे, प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. संदीप दहिफळे यांनी मनोगते व्यक्त केली.

यावेळी डॉ. महेश मोटे म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ भक्तीभाव व्यक्त करण्याचा सोहळा नसून सामाजिक बांधिलकी आणि प्रबोधन यांचा मिलाफ आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, सामाजिक,आरोग्यविषयक जनजागृतीपर उपक्रम, शिस्तबद्ध मिरवणूक या गोष्टींमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो.

आज गौरव झालेली मंडळे ही भाविकांसाठी आदर्श ठरावीत, अशी अपेक्षा आहे. निवड समितीने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, प्रबोधनात्मक देखावे, आकर्षक सजावट, सामाजिक उपक्रम, नागरिकांचे प्रबोधन, शिस्तबद्ध मिरवणूक, बालकलाकारांचे नृत्य यासारख्या विविध निकषांवर मंडळांचे मूल्यमापन करून पारितोषिकांची निवड केली. यामध्ये शहरातून प्रथम क्रमांकाचा मान किसान चौक येथील किसान गणेश मंडळांनी पटकावला, द्वितीय क्रमांक सोनार गल्ली येथील श्रीराम गणेश मंडळ तर तृतीय क्रमांक अशोक गणेश मंडळ यांना मिळाला.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गणेश मंडळांच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ढाल भेट देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक संतोष कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन सुनिल राठोड तर आभार कलाप्पा पाटील यांनी केले. यावेळी शहरातील विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, सदस्य व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## जि. प. शाळेचे शिक्षक भरत संत यांचा आमदार सौ. अनुराधाताई चव्हाण यांच्याकडून सत्कार



**फुलंब्री :** महाराष्ट्र राज्य शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल गोपाळपूर जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक श्री भरत संत सर यांचा फुलंब्री मतदार संघाच्या माननीय आमदार सौ. अनुराधाताई चव्हाण यांच्या कडून सत्कार व अभिनंदन करण्यात आले.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५

# वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील उगवता तारा डॉ. योगेशभैय्या देसरडा



स्वर्गीय प्राचार्य डॉ. शांतीलालजी देसरडा हे भारतातील नामवंत होमिओपॅथ, वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रात देशभर आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे व हजारो विद्यार्थी, शिक्षक, संस्थाचालक यांना मदतीचा हात देऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करून जीवनात उभे करणारे, त्यांच्यातील गुण हेरून त्यांना नेतृत्वाची संधी देणारे एक उत्तुंग व्यक्तीमत्त्व म्हणजे प्राचार्य डॉ. शांतीलालजी देसरडा सर होय. दोन दशकांपेक्षा जास्त काळ केंद्रीय होमिओपॅथी परिषद नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य होमिओपॅथी परिषद मुंबई या संस्थावर आपल्या सहकाऱ्यांना घेऊन वर्चस्व स्थापन करून होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य, ॲकॅडमिक कौन्सिलचे सदस्य, होमिओपॅथीक अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात अधिसभा, ॲकॅडमिक कौन्सिल, अभ्यासमंडळाचे अध्यक्ष आणि अधिष्ठाता म्हणून काम करतांना अनेकांचे प्रश्न मार्गी लावले. होमिओपॅथीक डॉक्टरांना, विद्यार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून प्रसंगी आंदोलने केली. फॉर्मकॉलॉजी विषय चालु करण्यासाठी प्रयत्न केले. अशा या अनेकांसाठी "देवमाणूस" असलेल्या स्व. देसरडा सरांचे सुपुत्र डॉ. योगेश भैय्या देसरडा.

**लढवय्या तरूण :**

संकटावर मात करत पुढे जाणारा लढवय्या तरूण म्हणजे डॉ. योगेश भैय्या देसरडा. वडील प्राचार्य, आई प्राध्यापिका अशा या सुसंस्कृत घरात जन्मतलेल्या डॉ. योगेश भैय्यांनी एम.बी.बी.एस. आणि एम्.डी.चे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. असे असले तरी अभियांत्रिकी आणि संगणक क्षेत्रातील उत्तम जाण आणि व्यावसायिक दुरदृष्टी असलेल्या या युवकावर 1 डिसेंबर 2018 रोजी एक संकट कोसळले. प्राचार्य डॉ. शांतीलालजी देसरडा सर आम्हा सर्वांना सोडून गेले. डॉ. देसरडा सर डी. के. एम. एम. वैद्यकीय महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य, गुरूमिश्री होमिओपॅथीक महाविद्यालय, शेलगाव, ता. बदनापूर, जि. जालना, देसरडा पब्लिक स्कुल शेलगाव, अटलबिहारी वाजपेयी होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय नेवासा फाटा अशा अनेक संस्थाचे संस्थापक म्हणून उभ्या केलेल्या संस्था, हजारो जीवाभावाचे मित्र, देशभरात उभे केलेले विद्यार्थी हा सगळा कार्यभार सोडून गेले. त्यांनी उभी केलेली अनेक माणसं व्याकूळ झाली, हवालदिल झाली. माझ्या सारख्यांना तर वाटलं आपल सर्वस्व गेलं. डॉ. योगेश भैय्या तर त्यांचे पोटचे एकुलते एक पुत्र वय पस्तशीच्या आत बाहेर आणि एवढे मोठे संकट अंगावर चालून आलेले सर्वानाच वाटत होते आता संपले, सरांनी उभ्या केलेल्या या संस्थाचा डोलारा आता हळूहळू कोसळणार. मात्र खडक फोडून येणाऱ्या रोपट्यासारखं आयुष्यभर अनेक संकटांचा सामाना करत हजारोंची सावली बनलेल्या प्राचार्य डॉ. शांतीलालजी देसरडा सरांचा हा सुपुत्र वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून संकटांशी दोन हात करून सरांनी सांभाळलेल्या त्यांचे मित्र, सहकारी, विद्यार्थी यांना आपुलकीने वागवत सरांनी उभे केलेल्या संस्थांचा डोलारा नुसता सांभाळला नाही तर त्याला आणखी जोमाने वाढवले. सर गेल्यानंतर ज्यांना वाटत होत सगळं संपल त्यांनीही डॉ. योगेश भैय्यांचे कौतुक केले. सरांच्या नंतरही सरांनी स्थापन केलेल्या संस्था सांभाळत त्यात गुरूमिश्री कॉलेज ऑफ फार्मसी, गुरूमिश्री आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी केली. गुरूमिश्री कॅम्पस वाढवला, तेथे आधुनिक सुविधा असलेले 100 खाटांचे सुसज्ज हॉस्पिटल आणि मुला-मुलींसाठी वसतिगृहे आणि मोठे सभागृह उभे केले. छत्रपती संभाजीनगरच्या गजबजलेल्या व उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या कॅनॉट परिसरात भगवान महावीर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या उभारणीत सिंहाचा वाटा उचलला. अहोरात्र मुंबई-दिल्लीच्या चकरा मारल्या. आरोग्याकडे दुर्लक्ष केले. पण सरांच्याही एक पाऊल पुढे टाकत आपले इच्छित ध्येय साध्य केले. सरांनी सांभाळलेल्या माणसांना नुसते तन आणि मनच नाही तर धनापासून सर्व मार्गाने मदत करून त्यांना सरांची उणीव भासू दिली नाही. माझ्या सारख्या सरांच्या मानसपुत्र असलेल्या माणसाला मोठ्या भावाचा दर्जा देऊन स्वत: लहान असूनही सर्वतोपरी मदत करून मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडीकल कॉलेज आणि मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा कौशल्य विकास संस्था काढून देऊन आर्थिक स्थैर्य मिळवून दिले.

**मातोश्रींचे योग्य मार्गदर्शन :**

डॉ. कांचन देसरडा या डॉ. योगेश भैय्या देसरडा यांच्या मातोश्री. अतिशय शीस्तप्रिय आणि आर्थिक नियोजनात अत्यंत कडक आणि तितक्याच भावनिक आणि मनमिळावू. सरांपेक्षाही मॅडमचा धाक जरा जास्तच पण अतिशय कणखर स्वभावाच्या, प्रशासकीय हतकंडा असलेल्या मॅडम सरांच्या नंतरही डगमगल्या नाहीत. त्यांनीही अनेक संकटे पचविलेले, सरांच्या अनुपस्थितीत व विपरित परिस्थितीत डी. के. एम. एम. वैद्यकीय महाविद्यालय असो की गुरूमिश्री वैद्यकीय महाविद्यालय मॅडमनी अतिशय कुशलतेने सांभाळले होते. मात्र सरांच्या जाण्याने त्याही फार हळव्या झाल्या. तरीही त्यांचे संस्कार मार्गदर्शन आणि आर्थिक नियोजन यांचा योग्य फायदा योगेश भैय्यांना झाला. योगेश भैय्या कॉलेजला नसले, दौऱ्यावर असले तर मॅडमनी तब्यतीची काळजी न करता कॉलेजला जाणार, सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची चौकशी करणार. चालु असलेल्या बांधकामावर लक्ष देणार आणि महत्त्वाचा सल्ला या बाबींमुळे डॉ. योगेश भैय्या देसरडा यांना खूप मदत झाली.

**पत्नी डॉ. कोमल यांची उत्तम साथ :**

डॉ. योगेश भैय्या यांच्या पत्नी डॉ. कोमलभाभी देसरडा या व्यवसायाने दंत चिकित्सक. काही काळ त्यांनी डॉक्टर म्हणून काम केले. सासऱ्यांच्या जाण्याने हळव्या झालेल्या सासू व पतीसाठी त्यांनी स्वत:च्या व्यावसायिक इच्छा आकांक्षांना सोडून कुटुंबाला प्राधान्य दिले. आल्या गेल्या सर्वांची योग्य सोय करणे, नाते संबंध सांभाळणे आणि वेळ प्रसंगी शाळा महाविद्यालय आणि हॉस्पिटलमध्ये भेट देऊन मार्गदर्शन करणे. मॅडमच्या आणि डॉ. योगेश भैय्याच्या अनुपस्थित सर्व संस्थांवर देखरेख करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या दोन लेकरांचा सांभाळ करत कुटुंबाचा डोलारा सांभाळला. आप्त स्वकियांसोबतच सरांनी जोडलेल्या माणसांना योग्य मानसन्मान देऊन देसरडा (सासर) आणि जैन (माहेर) कुटुंबाकडून मिळालेल्या सुसंस्काची शिदोरी सांभाळली. त्यांच्या विना अडथळा खंबीर साथीमुळे डॉ. योगेश भैय्या देसरडा यांना आपले ध्येय साध्य करण्यासाठी खूप मदत झाली यात शंका नाही.

डॉ. योगेश भैय्या देसरडा यांच्या या वाटचालीमध्ये बहिण डॉ. रश्मी आणि भावजी सी.ए. डॉ. अभय कुचेरिया, मंत्री ना. गिरीषजी महाजन, त्यांचे स्वीय सहाय्यक आरोग्यदुत रामेश्वरभाऊ नाईक, राज्याचे कॅबीनेट मंत्री ना. अतूलजी सावे, बदनापूरचे लोकप्रिय आमदार नारायणभाऊ कुचे, भाऊ माजी उपमहापौर प्रशांत देसरडा, तुषार देसरडा, कमलेश मुथा, पारस ओसवाल, सतिष ओसवाल यांचा मोठा वाटा असल्याचे विनम्रपणे मान्य करतात.

अशा या सतत धडपडत राहणाऱ्या लढावू, अभ्यासू, मनमिळावू आणि अनेकांचा आधार बनलेल्या डॉ. योगेश भैय्यांना पुढील कार्यास मनस्वी शुभेच्छा.

**प्राचार्य डॉ. हसन इनामदार**
मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा कॉलेज

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५

# जागतिक पर्यावरण आरोग्य दिन : शुद्ध हवा, निरोगी जीवन

दरवर्षी २६ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यावरण आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश म्हणजे पर्यावरणाचे आरोग्यावर होणारे परिणाम याबद्दल जनजागृती निर्माण करणे, समाजात पर्यावरणीय समज वाढवणे आणि प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनशैलीत सुधारणा करण्यासाठी प्रेरित करणे. जागतिक पर्यावरण आरोग्य दिनाची स्थापना आंतरराष्ट्रीय पर्यावरण आरोग्य महासंघ (IFEH) ने २०११ साली केली. या महासंघाने २६ सप्टेंबर हा दिवस पर्यावरणीय आरोग्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी निश्चित केला. या दिवसाचे आयोजन दरवर्षी एक विशिष्ट थीमसह केले जाते, ज्याद्वारे त्या वर्षीच्या महत्त्वाच्या पर्यावरणीय आरोग्य समस्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. २०२५ साली या दिवसाचे थीम आहे ती म्हणजे “शुद्ध हवा, निरोगी जीवन” (Clean Air, Healthy People). ही थीम आपल्याला सूचित करते की शुद्ध हवा आणि पर्यावरणीय संतुलन हा निरोगी जीवनाचा पाया आहे. आपल्याला शुद्ध हवेचे महत्त्व, वायू प्रदूषणाचे परिणाम, उपाययोजना आणि समाजाची जबाबदारी याबद्दल सविस्तर विचार करणे आवश्यक आहे.

हवेतील प्रदूषण हे मानवाच्या आरोग्यावर थेट आणि गंभीर परिणाम करणारे आहे. शुद्ध हवा नसल्यास श्वसनसंस्थेच्या रोगांचा धोका वाढतो. प्रदूषित हवेत असलेले सूक्ष्मकण फुप्फुसांमध्ये जाऊन श्वसन विकार निर्माण करतात. याशिवाय हृदयविकार, कर्करोग आणि लहान मुलांमध्ये फुप्फुसांच्या वाढीसंबंधी आजार निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. गर्भवती महिलांसाठी प्रदूषित हवा गरोदरपणातील गंभीर आजार निर्माण करू शकते. त्यामुळे शुद्ध हवा ही केवळ जीवनासाठी गरज नाही, तर ती आरोग्याचे मूलभूत अधिकार सुनिश्चित करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

वायू प्रदूषणाचे मुख्य स्रोत म्हणजे औद्योगिकीकरण, वाहनांचा वाढता प्रवाह, घरगुती इंधनाचा वापर, रस्ते बांधकाम आणि प्लास्टिक व इतर धातूंचे जळणे. विशेषतः भारतातील मोठ्या शहरांमध्ये प्रदूषणाची पातळी चिंताजनक आहे. दिल्ली, मुंबई, पुणे, कोलकाता यांसारख्या महानगरांमध्ये वायू प्रदूषणामुळे नागरिकांमध्ये श्वसन विकार, हृदयविकार आणि अलर्जी सारखे आजार वाढले आहेत. प्रदूषित हवेतील धूळ आणि विषारी वायू फुप्फुसातील पेशींवर दीर्घकालीन परिणाम करतात, ज्यामुळे लोकसंख्येतील आरोग्याची गुणवत्ता कमी होते.

पर्यावरणीय आरोग्याच्या दृष्टीने केवळ प्रदूषण कमी करणे पुरेसे नाही; आपण जीवनशैलीत बदल करूनही वातावरण स्वच्छ ठेवू शकतो. वाहतुकीसाठी सार्वजनिक वाहने, सायकलींग किंवा चालणे यांचा वापर केल्यास हवेतील प्रदूषण कमी होऊ शकते. औद्योगिक क्षेत्राने स्वच्छ तंत्रज्ञानाचा वापर करून उत्सर्जनावर नियंत्रण ठेवावे. घरगुती स्तरावर, पारंपरिक इंधनाऐवजी गॅस किंवा सौर ऊर्जा वापरणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. वृक्षारोपणाचे महत्त्वही यामध्ये विशेष आहे; वृक्ष हवेतील कार्बन डायऑक्साईड शोषतात, ऑक्सिजनचे प्रमाण वाढवतात आणि हवेतले विषारी घटक कमी करतात.

भारत सरकारने या क्षेत्रात विविध योजना राबविल्या आहेत. 'स्वच्छ भारत अभियान' आणि 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम' यांसारख्या उपाययोजनांमुळे प्रदूषणावर काही प्रमाणात नियंत्रण मिळाले आहे. तथापि, यशस्वीतेसाठी नागरिकांचा सहभाग आणि औद्योगिक क्षेत्रातील जबाबदारी अनिवार्य आहे. नागरी भागातील वाहतूक व्यवस्थेची सुधारणा, सार्वजनिक वाहने अधिक कार्यक्षम बनवणे, आणि औद्योगिक उत्सर्जनाच्या नियंत्रणासाठी कठोर नियम लादणे हे उपाय अत्यंत आवश्यक आहेत.

हवेच्या स्वच्छतेसाठी केवळ सरकार आणि औद्योगिक क्षेत्र जबाबदार नाहीत; तर प्रत्येक नागरिकाने यामध्ये आपला सहभाग देणे आवश्यक आहे. वाहनांची देखभाल, प्लास्टिक वगळणे, ऊर्जा बचत करणाऱ्या उपायांचा अवलंब, आणि घरगुती प्रदूषण कमी करणे या गोष्टी आपण आपल्या दैनंदिन जीवनात करू शकतो. याशिवाय, शालेय स्तरावर पर्यावरणीय शिक्षण देणे आणि तरुण पिढीमध्ये जनजागृती वाढवणे हे देखील महत्त्वाचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाने मिळून काम केल्यास शुद्ध हवा आणि निरोगी जीवनाची सुनिश्चितता होऊ शकते.

वायू प्रदूषणापेक्षा हवेतील सूक्ष्मकणांचे आरोग्यावर होणारे परिणाम सर्वाधिक गंभीर आहेत. हे कण फुप्फुसांत प्रवेश करून दीर्घकालीन आजार निर्माण करतात. विशेषतः प्रदूषित हवेत वाढणारी रासायनिक वायूंची मात्रा हृदयविकार, उच्च रक्तदाब, आणि अल्झायमर सारख्या रोगांना प्रोत्साहन देते. त्यामुळे “शुद्ध हवा, निरोगी जीवन” हे विषयाकेंद्रित संदेश केवळ तात्पुरता नाही तर दीर्घकालीन आरोग्याचे आव्हान आहे.

जागतिक स्तरावर, अनेक देशांनी पर्यावरणीय आरोग्य सुधारण्यासाठी विविध धोरणे आखली आहेत. विकसित देशांमध्ये औद्योगिकीकरण, वाहतूक, आणि ऊर्जा वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी काटेकोर नियम आहेत. भारतातील परिस्थिती तुलनेने गंभीर आहे कारण येथील जलद शहरविकास, वाहतुकीची वाढ, आणि औद्योगिकीकरण हवेतील प्रदूषण वाढविते. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होत आहेत. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने प्रत्येक देशाला आपापल्या परिस्थितीप्रमाणे उपाययोजना राबवण्याचे आवाहन केले आहे.

जागतिक पर्यावरणीय आरोग्य दिन हा दिवस नागरिकांना फक्त जागरूक करण्यापुरता मर्यादित नाही; हा दिवस एक सक्रिय भूमिका घेण्याची प्रेरणा देतो. आपण आपल्या घरगुती व औद्योगिक जीवनशैलीत बदल करून प्रदूषण कमी करू शकतो. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे, ऊर्जा बचतीची साधने वापरणे, वृक्षारोपण करणे आणि प्रदूषण निर्मितीची पातळी कमी करणे या उपाययोजना प्रत्येकासाठी उपयुक्त आहेत. याशिवाय, शहरांमध्ये हरित पट्ट्यांचा विकास करणे आणि प्रदूषण मोजण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे देखील आवश्यक आहे.

शुद्ध हवा ही फक्त पर्यावरणीय आवश्यकता नाही; ती निरोगी जीवनाची हमी आहे. शुद्ध हवेमुळे श्वसन विकार, हृदयविकार, आणि मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. याशिवाय, संतुलित पर्यावरणामुळे जीवनशैली निरोगी राहते आणि सामाजिक आरोग्यही टिकते. “शुद्ध हवा, निरोगी जीवन” ही थीम आपल्याला सांगते की आरोग्य आणि पर्यावरण यांचे आयुष्यातील संबंध अतिशय घट्ट आहेत.


शेवटी असे म्हणता येईल की, जागतिक पर्यावरण आरोग्य दिन हा दिवस आपल्याला आपल्यातील जबाबदारीची आठवण करून देतो. सरकार, औद्योगिक क्षेत्र, आणि नागरिकांनी मिळून उपाययोजना राबवल्या पाहिजेत. स्वच्छ हवा, सुरक्षित वातावरण, आणि निरोगी जीवन यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यायला हवे. शुद्ध हवा आणि पर्यावरणीय संतुलन याशिवाय निरोगी जीवनाची कल्पनाच अशक्य आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरणाचे रक्षण करणे आणि आपल्या जीवनशैलीत सुधारणा करणे आवश्यक आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५

# दौलत : प्रबोधनाचं विचारधन!




महाराष्ट्राच्या मराठी मातीत अनेक साहित्यिकांनी आपल्या सृजन लेखणीने वाचकांच्या हृदयावर नाममुद्रा कोरलेली आहे. यातील काही नावे उल्लेखनीय आहेत. त्यापैकी एक प्रतिभाशाली लेखक, विद्रोही कवी, साक्षेपी समीक्षक, सुंजार पत्रकार, तडफदार वक्ता, समाजशील माणूस म्हणजे ज्येष्ठ साहित्यिक मा. डी. बी. जगतपुरिया !

त्यांचा 'दौलत' हा कथासंग्रह वाचण्यात आला. कथा म्हटल्या की, कल्पनेच्या भराऱ्या असतात. परंतु कथालेखक जगतपुरिया यांनी सत्यनिष्ठा, वास्तवता यास कल्पकतेची जोड देऊन कथांना समाजाभिमुख केल्या आहेत. त्यामुळे लहानापासून तर ज्येष्ठांपर्यंत सर्वांनाच भुरळ पाडतात. अनेक पात्रांच्या व घडलेल्या घटनांच्या चित्रणातून वाचक कथेत रममाण होतो आणि आपणच कथेचा अविभाज्य घटक आहोत; अशी भावनिक धारणा तयार करतो.

या कथासंग्रहाला प्रथितयश साहित्यिक व विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांची अभ्यासू प्रस्तावना व मराठी साहित्यातून फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचारवारसा जपणारे डॉ. यशवंत मनोहर यांनी केलेली पाठराखण; यामुळे ह्या कथा निश्चितच अवलोकनास व आकलनास पात्र ठरतात.

'दौलत' कथासंग्रहात एकूण 25 कथा आहेत. यातील पहिली कथा 'आखाडा' ही शीर्षकाप्रमाणेच समाजविघातक कृतीविरुद्ध रणकंदनास सज्ज झालेली आहे. कामाच्या शोधात असलेला झिंगऱ्या हा पत्नी काशीला घेऊन सासरी येतो. काबाडकष्ट करून कुटुंबाचे भरणपोषण करतो. परंतु काही टवाळखोर 'घरजावई' म्हणून झिंगऱ्याला डिवचतात. यातून सुटका व्हावी म्हणून झिंगऱ्या आपल्या गबरू या मुलाला कसरतीचे धडे देऊन पहेलवान बनवतो आणि टवाळक्यांचा बंदोबस्त करतो. या कथेतून लेखक क्रांतिकारी विचारसरणीचा परिचय करून देतो.

मुक्या पशू-पक्ष्यांना खाद्यान्न भरविणारे बाबुराव बोर्डे हे आपल्या कर्माने 'कर्मयोगी बाबुराव' म्हणून परिसरात ओळखले जातात. म. गौतम बुद्धाच्या दान, दया, करुणा या सद्गुणांची पेरणी करून प्रत्येकाने भूतदया आपल्या अंगी बाणवण्याचे आत्मबळ 'कर्मयोगी बाबुराव' या कथेतून मिळते. अशाचप्रकारे 'भैय्यासाहेब' ही कथा एका निःस्वार्थी व परोपकारी व्यक्तीच्या त्यागाची आहे. परंतु नियतीला वेगळेच काही मान्य असते. भैय्यासाहेब यांची पार्किन्सन या रोगाने प्राणज्योत मालवते; तेव्हा गावकऱ्यांच्या आक्रोशाने काळजाला चिरे पडतात. मन हेलावून टाकणारी ही कथा तथाकथित समाजसेवकांचे वाभाडे काढते.

'श्रमयोगिनी नबा', 'शबनम, 'गिरजा','ऐनूर आपा', 'अनुबंध', 'झुंज', 'उड्डाण', 'निर्धार' या कथेतील स्त्रीपात्रे आत्मबळाच्या जोरावर अनिष्ट प्रवृत्तीवर, अंधश्रद्धेवर, गरिबीवर मात करून स्व-अस्तित्वाचे वेगळेपण सिद्ध करतात. आपल्या कृतिपर कर्तृत्वाने समाजजीवनाला अचंबित करतात. स्त्रीत्वाच्या भूमिकेला सामाजिक बांधिलकीशी जोडतात. लेखकाने या कथांतून स्त्रियांच्या संघर्षमय जीवनाचे आदर्श चित्रण रेखाटले आहे. संवादी व प्रवाही लेखणीने वाचकांना विशेषकरून महिलावर्गाला मौलिक 'इंधन' पुरवण्याचा पुरेपूर प्रयत्न केलेला आहे.

सोबतच मेहनती चिंटूचे 'राबणारे हात' कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडून निराधार मुलांसाठी आधार बनतात. 'जिगरबाज' सतीश हा जास्त पैशाच्या मोहात न पडता स्वीकारलेल्या कामाला न्याय मिळवून देण्याची त्याची धिटाई शब्दातीत आहे. अमाप पैसा कमावण्याचा मोह नसलेला 'डॉ. कैलास' हा कुऱ्ह्यासारख्या ग्रामीण भागात रुग्णांची सेवा करून आरोग्यकुळातील श्रेष्ठ दर्जाचे 'धन्वंतरी' म्हणून नावलौकिक मिळवितो. तर लोकांच्या कामी येणारा, अंधाऱ्या वाटेत उजेड पेरणारा ऊर्जादायी व 'चैतन्ययात्री' जगदीश देवपूरकर आपले नाव सार्थकी ठरवतो. 'जगदीश' म्हणजे 'ब्रम्हांडाचा स्वामी.' याप्रमाणे हरहुन्नरी कलवंत म्हणून सर्वांच्या भल्यासाठी कार्यतत्पर असतो. ही पुरुषपात्रे सुद्धा वेगवेगळ्या कथांतून समाजाप्रति असलेली आस्था जोपासतात.

'सृजनोत्सव' या कथेचा नायक नागपूरचा संजय गोडघाटे हा आहे. वजनी असलेल्या गॅस सिलेंडरला खांद्यावर घेऊन अनेक मजली इमारती चढून घरोघरची चूल पेटवतो. तो श्रमणसंस्कृतीला प्रामाणिकपणे जपतो. कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा, म्हणून धडपडतो. पुरोगामी विचारांचा पाईक असल्याने स्वाभिमानाने जगतो. प्रतिभावंत कवी संजय गोडघाटे हा कवितेतून तत्त्वांचा जागर करतो. अशा प्रतिकूल परिस्थिती संजय जगण्यातला 'सृजनोत्सव' दैनंदिनी साजरा करीत असतो. त्याचा संघर्ष म्हणजे त्याच्या जगण्यातला आवेश होय. ही कथा वाचून श्रमजीवींना प्रेरणा मिळते.

'झडप' था कथेतला इन्स्पेक्टर सुधीर व गो-तस्करी करणारा सांबा हे लहानपणचे मित्र असतात. परंतु सांबाचे कुकृत्य सुधीरच्या निदर्शनास आल्यावर तो सांबाला तुरुंगाची हवा दाखवतो. दोन मित्रांतील सत्य-असत्य वृत्तीच्या संघर्षातून फुललेली ही कथा समाजहिताची पाठराखण करते. निवडणुकीवेळी मंत्री मतदारांच्या दारात मतांसाठी लोटांगण घालतात. पण नंतर मात्र त्यांचे दर्शनही होत नाही. ही वास्तव स्थिती लेखकाने 'मंत्र्याची भेट' या कथेतून वाचकांच्या लक्षात आणून दिली आहे. ही कथा आजच्या राजकीय परिस्थितीला दिग्दर्शित करते.

'सुरुंग' ही कथा लोकशाहीचा स्तंभ असलेल्या पत्रकारितेवर आधारित आहे. यात जय चॅनेलचे पत्रकार प्रणव परिहार हा गुंड व सावकार असलेल्या रावसाहेबाच्या ड्रग रॅकेटला व त्याला साथ देणाऱ्या बुधोजीच्या सरकारच्या जुलमी धोरणाला 'सुरुंग' लावतो आणि पत्रकारितेवरचा लोकांचा विश्वास प्रगाढ करतो. 'झुंजार पत्रकार' शेखरसुद्धा भ्रष्टाचाराला खिळ घालतो. पत्रकारांनी लोककल्याणासाठी आपली लेखणी झिजवावी; ही लेखकाची अपेक्षा पूर्णत्वास जाते. 'युवाशक्ती'चा प्रतीक असलेला ज्ञानेश्वर चौरे हा 'भोगऱ्या बाजारा'तील हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांचा बंदोबस्त करून आदिवासींना न्याय मिळवून देतो. तर 'उचापतखोर' ही कथा उधारीवर जगणाऱ्या आडदांडग्यांचा समाचार घेते.

शेवटची 'दौलत' ही कथा कथासंग्रहाची बीजकथा आहे. लेखकाने या कथेत छबीलाल नावाच्या चित्रकला शिक्षकाचे व्यक्तिचित्रण गांभीर्याने व मार्मिकपणे रेखाटले आहे. दौलत म्हणजे संपत्ती! सर्वसामान्यपणे पैसा, जमीन, बंगला यांची पैशातील किंमत म्हणजे 'दौलत' असे मानले जाते. परंतु कथालेखक डी. बी. जगतपुरिया यांनी उपकाराची कृतज्ञता, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, समाजभान, सद्गुण या मूल्यांनाच खरी दौलत असल्याचे छबीलाल यांच्या कार्यप्रयोजनातून लक्षात आणून दिले आहे आणि 'दौलत' हे शीर्षक सार्थ ठरविले आहे.

कथालेखक डी. बी. जगतपुरिया यांचा 'दौलत' कथासंग्रह विचाराचे, संस्काराचे, विज्ञानवादी दृष्टिकोनाचे, जागरणाचे विचारधन आहे. वाङ्मयीन मूल्यांचा अनमोल खजिना आहे. या कथांना ज्ञानप्रबोधनाचा भक्कम पाया आहे; हे मुखपृष्ठावरून दृग्गोचर होते.

लेखक हे पुरोगामी विचाराचे व कणखर बाण्याचे स्फूर्तिदायी व्यक्तिमत्त्व आहेत. ते स्वप्नाळू नाहीत; सामाजिक जीवनाला बौद्धिक व वैचारिक दिशा देणारे साहित्यिक आहेत. म्हणूनच त्यांनी स्वानुभवसंबद्ध व्यक्तिचित्रे व घटनाचित्रे वास्तवपणे निवडलेली आहेत. या कथा लघुकथेत मोडत असल्यातरी लज्जतदार व लाजबाब असून लक्षणार्थदृष्ट्या लाजमी आहेत. हलक्या, फुलक्या व पचनी पडणाऱ्या शब्दसांभारातून ह्या कथा रसिकांना निश्चितच आवडतील; असा विश्वास आहे. लेखकाला पुढील साहित्यलेखनासाठी सम्यक शुभेच्छा!

**प्रभाकर तांडेकर (प्रदत्त), नागपूर**
**(मो. 9421803498)**